# प्रकरण - ३ : जोडाक्षरांचे लेखन

घटक - (४)

१). जोडाक्षरे व ते साधण्याचे प्रकार
२). जोडाक्षरे लिहिण्याच्या पद्धती
३). जोडाक्षरांचे लेखन
४). शब्दांतील मूलध्वनी व जोडाक्षरे मोजणे.

## १). जोडाक्षर व ते साधण्याचे प्रकार :-

१). व्यंजन + स्वर = अक्षर
उदा., क् + अ = क , क् + ऋ = कृ

२). स्वर + स्वर = संयुक्त स्वर
उदा., आ + इ = ऐ

३). व्यंजन + व्यंजन = व्यंजन
उदा., म् + ह् = म्ह् , क् + ष् = क्ष्

४). व्यंजन + तेच व्यंजन = द्वित्त
उदा., क् + क् = क्क्

५). दोन / अधिक व्यंजने + स्वर = जोडाक्षर
उदा., म् + ह् + अ = म्ह , क् + ष् + अ = क्ष , च् + छ् + व् + आ = च्छ्वा

## २). जोडाक्षरे लिहिण्याच्या पद्धती :- (जोडाक्षरांची जोडणी) (२)

१). आडवी जोडणी :- एकापुढे एक वर्ण / अक्षरे लिहिण्याला आडवी जोडणी म्हणतात.
उदा., टक्कल, विठ्ठल, चिठ्ठी, दिल्ली, चिक्कल इत्यादी
२). उभी जोडणी :- एकाखाली एक अक्षरे लिहिण्याला उभी जोडणी म्हणतात
उदा., टक्कल, विठ्ठल, चिठ्ठी, दिल्ली.

## ३). जोडाक्षरांचे प्रकार :- (६)

व्यंजनामध्ये दंड लिहिण्याच्या पद्धतीनुसार पुढीलप्रमाणे जोडाक्षरांचे ६ प्रकार पडतात.

१). मध्ये उभा दंड असणारी व्यंजने :-
उदा., क्, फ्
क् (क) = रक्त, मुक्ता, फक्त
फ् (फ) = ~~फक्त~~ चाफ्याचे, फ्लॉवर

२). शेवटी उभा दंड असणारी व्यंजने :-
उदा., ख् - ख्याती, त् - उत्तर, न् - उन्हात, झ् - माझ्या
घ् - वाघ्या, थ् - तथ्य, प् - दप्तर
च् - कच्चा, ध् - ध्यान, ब् - शब्द, अब्ज
ज् - ज्यांशी, ष् - पुष्प, भ् - अभ्यास, भ्याड
य् - शय्या, स् - मस्त, म् - म्हणी, म्हातारी

३). शेवटी स्वतंत्र उभा दंड असणारी व्यंजने :-
उदा., ग् - ग्लास, रुग्ण
ण् - अरण्य
श् - प्रश्न, श्याम, श्वान, अश्व.

४). अर्धा दंड असणारी व अर्धा दंड तोडू शकणारी व्यंजने :-
उदा., छ् - उच्छ्वास, स्वच्छ.
ल् - प्रल्हाद, अल्प
ळ् - काळ्या, मळ्यात, गळ्यात

५). अर्धा दंड असणारी व अर्धा दंड न तोडू शकणारी व्यंजने :-
उदा., ट् - ट्रक, ट्रस्ट, ह् - सह्याद्री, साह्य
ठ् - विठ्ठल, चिठ्ठी, द् - बद्दल, आद्दल
ड् - गाड्यावर, अड्डा
ङ् - वाङ्मय

६). दंड नसलेले व्यंजन :
उदा., र् - गुऱ्हाळ, तर्क, स्वर्ग, चर्चा, दर्जा, अर्जित.

जोडाक्षरांमध्ये र् चे लेखन चार प्रकारे केले जाते.
उदा., ‿ - स्वर्ग
- - जाणाऱ्या, येणाऱ्या
/ - भ्रष्ट
^ - राष्ट्र, ट्रक.

७). शब्दांतील मूलध्वनी व जोडाक्षरे मोजणे :-

शब्दातील मूलध्वनी मोजताना प्रथमतः शब्दाची फोड करावी.
स्वर विचारल्यास स्वर सांगावे,
व्यंजन विचारल्यास व्यंजन सांगावे
मूलध्वनी विचारल्यास स्वर, स्वरादी, व्यंजने सांगावित
जोडाक्षरे विचारल्यास जोडाक्षरे सांगावे.

उदा., १). राम = र् + आ + म् + अ
व्यंजने = 2
स्वर = 2
मूळध्वनी = ४
जोडाक्षर = -

२). राष्ट्रपती = र् + आ + ष् + ट् + र् + अ + प् + अ + त् + ई
व्यंजने = ६
स्वर = ४
मूलध्वनी = १०
जोडाक्षर = १